| MHSN030005042024 | **म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र. २२/२०२४ मधील निशाणी ५ खालील आदेश**<br>**शोभा शेडगे वि. नंदू शेडगे व इतर** |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून प्रतिबंधक अधिनियमचे कलम २३ अन्वये दाखल केलेला आहे.

२. अर्ज वाचला. अर्जावरील म्हणणे निशाणी १७ वाचले. अभिलेखावरील दाखल कागदपत्रे वाचले. दोन्हीही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार व जाबदार यांचे मत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र अनुक्रमे निशाणी १५ व १९ वाचले. कौटुंबिक घटना अहवाल अभिलेखावर दाखल नाही.

३. प्रस्तुत प्रकरणातील अर्जाचा ऊहापोह करण्यापूर्वी ज्या बाबी दोन्ही पक्षांना मान्य आहेत त्या बाबी पाहणे गरजेचे आहे. ते खालीलप्रमाणे–

अ. अर्जदार ही जाबदार क्र. १ यांची कायदेशीर पत्नी आहे.

ब. इतर जाबदार हे अर्जदाराचे लग्नानंतरचे नातेवाईक आहेत.

क. अर्जदार व जाबदार क्र. १ यांना लग्नापासून एक मुलगा व एक मुलगी आहे.

ड. अर्जदार व जाबदार दि. ०६.०२.२०२१ पासून वेगळे राहत आहेत.

४. अर्जदाराच्या कथनांप्रमाणे दि.०६.०५.२००६ रोजी तिचा व जाबदार क्र. १ यांचा विवाह मंगल कार्यालय, हरिपूर, सांगली येथे एकमेकांच्या संमतीने संपन्न झाला. सदरील विवाहाचा संपूर्ण खर्च हा अर्जदाराच्या घरातील मंडळींनी केला. जाबदार क्र. १ पासून अर्जदार यांना जितेश हा मुलगा व साक्षी ही मुलगी अशी दोन अपत्ये आहेत. जाबदार

क्र. १ हे अर्जदाराचे पती असून जाबदार क्र. २ ही नणंद व जाबदार क्र. ३ हे जाबदार क्र. २ चे पती व जाबदार क्र. ४ व ५ हे नणंदेची मुले आहेत. तसेच जाबदार क्र. ६ ही नणंद आहे.

५. अर्जदाराचे पुढील कथन असे की, अर्जदार व जाबदार क्र. १ यांच्या विवाहाचे वेळी जाबदार क्र. १ हे अर्जदार यांच्या घरी पंधरा दिवस राहिले. सदर विवाहानंतर अर्जदार यांच्या भावाच्या घरीच गृहप्रवेशाची विधी केली व जाबदार निघून गेले. जाबदार यांनी पंधरा दिवसांनी येऊन अर्जदाराला घेऊन जातो असे सांगितले. परंतु जाबदार यांनी फोन केला नाही व चौकशीही केली नाही. त्या दरम्यान जाबदार क्र. १ यांच्या वहिनी अर्जदार यांच्या भावाला फोन केला व अर्जदार यांना मुंबईला पाठवून द्या असे सांगितले. त्यावेळी अर्जदार यांनी जाबदार क्र. १ यांना फोन केला असता जाबदार क्र. १ याने आठवडाभरात घेऊन जातो असे सांगितले. त्यानंतर जाबदार क्र. १ हे अर्जदाराला आठवड्याभराने सांगलीला आले व जाबदार क्र. १ च्या घरी नांदावयास घेऊन गेले.

६. अर्जदाराचे पुढील कथन असे की, अर्जदार सासरी नांदावयास गेल्या त्या दिवशी वटपौर्णिमा होती. म्हणून वट पूजनासाठी जाबदार क्र. ३ सोबत अर्जदार गणपती मंदिर, एअर इंडिया कॉलनी येथे गेल्या व त्या ठिकाणी अर्जदार वट पूजन करत असताना एक स्त्री आली व 'नंदु माझा नवरा आहे, तुझा नाही, तू त्याच्या नावाने वट पूजन करायचे नाही' असे म्हणून अर्जदाराशी वाद घालू लागली. सदरचा घडलेला प्रकार पाहून अर्जदाराला काहीही कळेनासे झाले. त्यावेळी जाबदार क्र. २ यांनी जाबदार क्र. १ यांना बोलावून घेतले व अर्जदाराने जाबदार क्र. १ याला सदर स्त्री कोण आहे असे विचारले असता त्यांनी उडवा-उडवीची उत्तरे दिली व अर्जदाराला घरी घेऊन आले. त्यानंतर ती स्त्री पोलिसांनी घेऊन घरी आली व पोलिसांनी जाबदार क्र. १ व २ यांना पोलीस स्टेशनला घेऊन गेले. सदर स्त्रीचे व जाबदार क्र. १ यांचे संबंध आहेत हे अर्जदाराला स्पष्ट झाले.

अर्जदार ही नांदायला गेलेल्या पहिल्या दिवशीच असा प्रकार पाहून तिच्या पायाखालची जमीनच सरकली.

७. अर्जदाराचे पुढील कथन असे की, अर्जदार सासरी नांदावयास गेले तेथे दहा बाय दहाच्या दोन खोल्या व शेजारी जाबदार क्र. २ ते ५ राहत होते. तसेच जाबदार क्र. ६ तेथेच जवळ राहत होत्या. पूर्वी जाबदार क्र. २ या स्वयंपाक करून भाऊ व आईंना देत असत. अर्जदार हिला त्यांनी स्वयंपाक करायला दिला नाही. जाबदार क्र. २ या स्वतःच सगळे करत होत्या व अर्जदाराला घरात काम करायला देत नसत. तसेच अर्जदार पाणी प्यायला गेली असता जाबदार क्र. ५ ही अर्जदाराला तुझे घाण हात लावू नकोस तू घाणेरडी आहेस, तुला काही येत नाही वगैरे बोलत असत.

८. अर्जदाराचे पुढील कथन असे की, जाबदार क्र. १ ची आई एअरपोर्ट वर सफाई कर्मचारी म्हणून कामास होती. त्यांचे काम शिफ्टमध्ये असायचे. त्यामुळे सगळ्यांचे जेवण जाबदार क्र. २ या करत असत. त्यामुळे अर्जदार यांनी स्वतःहून स्वयंपाक करायला गेल्या की, तू घाणेरडी आहेस, तुझ्या हातचे माझा भाऊ खाणार नाही असे म्हणून गप्प बसून जे वाढतो ते खा असे अर्जदाराला बोलत असत. त्यानंतर अर्जदाराला जाबदार क्र. १ ची आई यांनी स्वयंपाक करण्याची परवानगी एक वर्षानंतर दिली. लग्नानंतर पहिल्या दिवाळीकरिता अर्जदाराला तिचा भाऊ घेऊन जाण्यासाठी आल्यानंतर जाबदार क्र. १ यांनी तिला घेऊन जायचे असेल तर कायमचे घेऊन जा असे सांगितले. त्यामुळे अर्जदाराचा भाऊ काहीही न बोलता सांगलीला परत आले.

९. अर्जदाराचे पुढील कथन असे की, अर्जदार गरोदर असताना जाबदार क्र. १ यांनी तिला फरफटत घेऊन गेले व तिला शिवीगाळ करून तिच्या पोटात व कंबरेत लाथ

मारली. त्यामुळे त्यांच्या पोटात दुखू लागले म्हणून जाबदार क्र. १ च्या आईने तिला दवाखान्यात घेऊन गेली. त्यावेळी सोनोग्राफी केली असता डॉक्टरांनी सांगितले की मूल मयत झाले असून पोटात विष पसरले आहे, इतके दिवस का गप्प बसला. त्यानंतर अर्जदाराचा गर्भपात झाला. अर्जदारास दवाखान्यात दाखवण्यास उशीर झाला असता तर तिला जिवास मुकावे लागले असते. जाबदार यांच्या दहशतीमुळे व मूल गेल्यामुळे अर्जदार या प्रचंड मानसिक तणावाखाली जीवन जगत होत्या. अशा प्रकारे जाबदार हे अर्जदार यांना वारंवार या ना त्या कारणाने शिवीगाळ व मारहाण करून वारंवार त्रास देत होते.

१०. अर्जदाराचे पुढील कथन असे की, अर्जदार यांचे पहिले बाळंतपण मुंबई येथे झाले. बाळंतपणानंतरही अर्जदाराला जाबदार क्र. १ हे शिवीगाळ करून मारहाण करत व मानसिक त्रास देत असत. अर्जदार या घरातील कामे करून मुलाचा सांभाळ व्यवस्थित करत होत्या. अर्जदार यांना पुन्हा दिवस गेले. अर्जदार ही गरोदर आहे हे माहीत असतानादेखील जाबदार क्र. १ हे तिची काळजी न घेता तिला वारंवार त्रास देत असल्याने ती मानसिक तणावाखाली जगत होती. जाबदार क्र. १ हे अर्जदाराच्या घरी येऊन अर्जदारासोबत भांडण करून मुलगा जितेश याला जबरदस्तीने मुंबईला घेऊन गेले व मुलगी साक्षी ही सहा महिन्याची झाल्यानंतर तिलाही मुंबईला घेऊन गेले.

११. अर्जदाराचे पुढील कथन असे की, अर्जदार ही जाबदार यांनी केलेला त्रास निमूटपणे सहन करत होती. परंतु जाबदार क्र. १ च्या वागण्यात काहीही फरक पडत नव्हता. जाबदारांनी केलेल्या मारहाणीमुळे व नेसत्या कपड्यानिशी अर्जदार यांना घरातून बाहेर हाकलून दिले. जाबदारांच्या त्रासाला कंटाळून अर्जदार ही माहेरी निघून आली. जाबदार यांनी अर्जदार यांना वेळोवेळी वारंवार शारीरिक व मानसिक त्रास देऊन अमानुषपणे मारहाण करून कौटुंबिक छळ केला व अर्जदार यांना नांदवून घेण्यास टाळाटाळ केली. सबब,

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज सदर कायद्याचे कलम १२ प्रमाणे दाखल केले आहे व प्रस्तुतचे अर्जाचा निकाल लागेपर्यंत दरमहा अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रू. १५,०००/- व घरभाडे म्हणून दरमहा रक्कम रू. ८,०००/- तसेच वकील फी व अन्य खर्च असे एकूण २५,०००/- रुपये इतक्या रकमेची मागणी केली आहे. तसेच अर्जदाराने जाबदार यांचेकडून कौटुंबिक हिंसाचारापासून प्रतिबंध करण्यासाठी संरक्षण आदेश मागितला आहे.

१२. जाबदार यांनी अर्जदाराच्या अर्जामधील सर्व कथने नाकारलेली आहेत व अर्जदार ही जाबदार यांना शारीरिक व मानसिक त्रास देत होती, तसेच तिला जाबदार यांचेसोबत नांदायचे नसल्याने त्यांचा शारीरिक व मानसिक छळ करत होती असे कथन केले आहे. जाबदार यांनी पुढे असे कथन केले आहे की, जाबदार क्र. १ यांची मोठी बहीण बाजूच्या घरामध्ये राहत होती व ती दोन्ही लहान मुलांचे खाणेपिणे व सेवासुश्रुशा करत होती. अर्जदाराला काहीही काम नसे. अर्जदार तिच्या रागीट स्वभावामुळे तिला अचानक राग आल्यावर ती दोन्ही मुलांना मारहाण करत होती. जाबदार क्र. १ हे व त्यांची बहीण मुलांचे फार लाड करत होते. अशा वेळी अर्जदार ही जाबदार क्र. १ व त्यांच्या बहिणीमध्ये भांडण लावण्याचा प्रयत्न करत होती. जाबदार क्र. १ हे स्वतः दोन्ही मुलांना शाळेत सोडणे व शाळेतून घेऊन येण्याचे, कपड्यालत्त्याचे व इतर सर्व छोटी मोठी कामे स्वतःचा कामधंदा सांभाळून अर्जदाराला त्रास नको म्हणून करत होते. तसेच अर्जदार ही जाबदाराशी भांडण काढून दुसरीकडे राहायला जाण्याबाबत वारंवार जाबदार क्र. १ ला मानसिक त्रास देत होती. त्यामुळे जाबदार क्र. १ हे आपल्या आईचे दोन खोल्यांचे घर सोडून एअर इंडिया कॉलनी येथे कंपनीच्या घरामध्ये अर्जदार व दोन लहान मुलांना राहण्यास घेऊन गेले. मात्र अर्जदार त्या ठिकाणीही व्यवस्थित राहिली नाही.

१३ त्यानंतर सन २०२० साली अर्जदार हिने जाबदार क्र. १ शी भांडणतंटा करून माहेरी निघून गेली. त्यावेळी जाबदार क्र. १ यांनी वारंवार फोन करून व सर्व पै–पाहुण्यांशी सल्लामसलत करून अर्जदाराला परत येण्यास भाग पाडले. जाबदार क्र. १ हे अर्जदाराच्या भावाला ॲडमीट असल्यामुळे बघायला आल्यानंतर अर्जदाराचा मोठा भाऊ व भाऊजी यांनी जाबदार क्र. १ सोबत भांडणतंटा केला. त्यानंतर सर्व पै–पाहुणे व नातेवाईक यांचे फोनवरून बोलणे झाल्याने अर्जदार स्वतः जाबदार क्र. १ यांना मुंबईला राहण्यास येतो म्हणाल्या. परंतु अर्जदार यांच्या भांडखोर स्वभावामुळे अर्जदार पुन्हा जाबदार व त्यांचे कुटुंबासोबत भांडणतंटा करू लागल्या. जाबदार क्र. १ यांच्या मुंबई येथील आईच्या घरी समोरचे असलेले शेजारी चांगले प्रवृत्तीचे नसल्यामुळे जाबदार यांनी अर्जदार यांना सूचना दिली होती. परंतु अर्जदार ही जाणूनबुजून जाबदार क्र. १ शी भांडणतंटा करून शेजारीपाजारी यांचेशी वारंवार बोलत असत. त्यामुळे अर्जदार व जाबदार यांच्यामध्ये भांडणतंटा होऊ लागला. अशा प्रकारे वारंवार होणाऱ्या भांडणामुळे अर्जदार स्वतःहून कोणतेही मारहाणीचे अथवा मोठे कारण नसताना गेली अडीच वर्षे माहेरी सर्व सोने नाणे घेऊन व मुलांना सोडून निघून गेली.

१४. अर्जदार माहेरी निघून गेल्यानंतर आजअखेरपर्यंत दोन्ही मुलांची चौकशी देखील केली नाही अथवा मुलांना पाहण्यासाठी मुंबईला आली नाही. अर्जदार व जाबदार क्र. १ यांचा मोठा मुलगा जितेश सध्या सोमय्या कॉलेज, विद्याविहार, घाटकोपर, मुंबई येथे इयत्ता ११ वी मध्ये शिक्षण घेत आहे. त्याची ट्युशन फी व कॉलेज फी रक्कम रू. १,५०,०००/– आहे. तसेच मुलगी साक्षी ही सध्या सेंडमेरी हायस्कूल कलिना, सांताक्रुझ, मुंबई येथे इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेत आहे व तिची ट्युशन फी व स्कूल फी रक्कम रू. ७०,०००/– इतकी वार्षिक आहे. दोन्ही मुलांची जबाबदारी जाबदार क्र. १ हे स्वतः पाहत

आहेत. जाबदार क्र. १ यांना कंपनीने जानेवारी २०२३ मध्ये सेवा खंडीत केलेली आहे. जाबदार क्र. १ हे एअर इंडिया कंपनीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात कामास होते. त्यांना मासिक पगार रक्कम रू. २५,०००/– सेवा खंडीत होताना पगार होता. जाबदार क्र. १ यांचेवर त्यांच्या दोन मुलांचे संगोपन, कपडेलत्ते, शिक्षण व औषधपाण्याचा खर्च असल्यामुळे व सर्व कुटुंबीयांची व बहिणीचीही जबाबदारी आहे. सद्यःस्थितीत जाबदार क्र. १ नोकरीवर नसल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती गरिबीची आहे. याउलट अर्जदार यांची वडिलोपार्जित सांगलीच्या मध्यवर्ती एरियामध्ये मोठा बंगला आहे व त्यांची आर्थिक परिस्थिती पूर्वीपासूनच श्रीमंतीची आहे. सबब जाबदार यांनी अर्जदाराचा अर्ज नामंजूर होण्याची विनंती केली आहे.

१५. अर्जदाराने तिच्या अर्जातील कथनांच्या समर्थनाकामी प्रतिज्ञापत्र व काही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तसेच अर्जदाराने कागदपत्रापैकी विवाहाची यादी, अर्जदार व जाबदार क्र. १ यांचा फोटो, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, अर्जदाराने जाबदारांविरूद्ध दिलेली तक्रार व अर्जदार यांचे आधारकार्डाची छायांकीत प्रत, तसेच वाशी कोल्हापूर येथील गट क्र. २/३३ चे खरेदीपत्राची, ७/१२ व ८–अ चे छायांकीत प्रती दाखल केले आहे. मात्र जाबदार यांनी त्याच्या कथनांच्या समर्थनाकामी कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

१६. अंतरिम पोटगीचा अर्ज निकाली करतेवेळी असा अर्ज प्रतिज्ञापत्रासोबत दाखल केला आहे का हे पाहणे गरजेचे आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने तिच्या अर्जातील कथनांच्या समर्थनाकामी प्रतिज्ञापत्र व कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. जाबदार व अर्जदार यांचे कथनांचे अवलोकन केले असता अर्जदाराने तिला झालेल्या त्रासाबाबत वेळोवेळी पोलिसात तक्रार दिलेली दिसून येत नाही. मात्र अर्जदाराने जाबदार यांचेविरुद्ध दि. ०७.१२.२०२३ रोजी पोलीस स्टेशन वाकोला येथे भा.द.वि.कलम ५०४, ५०६ प्रमाणे

तक्रार दिलेली आहे. सदर तक्रारीचे व अर्जदारांच्या कथनांचे अवलोकन केले असता अर्जदाराच्या कथनांमध्ये प्रथमदर्शनी तथ्य आढळते. अर्जदाराने तिच्या कथनांच्या समर्थनाकामी अभिलेखावर कागदोपत्री पुरावा दिलेला आहे. वरील कारणास्तव प्रथमदर्शनी अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचाराची पिडीता आहे हे शाबीत होते.

१७. अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचाराची पिडीता आहे हे शाबीत झाले तर तिला संरक्षण आदेश मिळावा, अशी विनंती केलेली आहे. याउलट जाबदार यांनी असा संरक्षण आदेश देता येणार नाही असा युक्तिवाद केला. अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेली अदखलपात्र तक्रारीचे व तिच्या कथनांचे अवलोकन केले असता तसेच प्रस्तुत कायद्याचा उद्देश लक्षात घेता कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकामी अर्जदारास कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण देणे गरजेचे आहे.

१८. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये जाबदार क्र. १ हे एअर इंडियामध्ये सिक्युरिटी गार्ड म्हणून नोकरी करत असून त्यांना दरमहा रक्कम रू. ८०,०००/– इतका पगार आहे. तसेच जाबदार यांचे ऐराली येथे फ्लॅट व एअर इंडिया मेनगेट येथे दोन खोल्यांची मिळकत आहे. तसेच कोल्हापूर येथे जाबदार यांची वाशी या गावी बिरदेव मंदिराजवळ सात गुंठे जमीन आहे. एकंदरीतच जाबदार  क्र १ हे गर्भश्रीमंत असून अर्जदार ही तिच्या माहेरी आश्रिताचे जीवन जगत आहे. तिच्याकडे उदरनिर्वाहाकामी कोणतेही साधन नाही. सबब, अर्जदाराने तिचे उदरनिर्वाह कामी अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रू. १५,०००/– अर्ज दाखल तारखेपासून मागितलेले आहे.

१९. याउलट जाबदार यांनी त्यांचा मुलगा जितेश व मुलगी साक्षी यांची जबाबदारी त्यांच्यावरच आहे व त्यांना दरवर्षी रक्कम रू. २,००,०००/– प्रमाणे खर्च येत असून सन

२०२३ मध्ये त्यांची सेवा खंडीत झालेली आहे व ते नोकरीवर नसल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती ही गरिबीची आहे. अर्जदार यांचा सांगली मध्यवर्ती भागात मोठा वडिलोपार्जित बंगला आहे. तसेच अर्जदाराच्या भावांचा मांसविक्रीचा व्यवसाय आहे. सबब अर्जदाराने केलेली मागणी ही हास्यास्पद असून ती नामंजूर करण्यात यावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

२०. वरील सर्व कथनांचे अवलोकन केले असता अर्जदार व जाबदार यांनी एकमेकांच्या नेमक्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. मात्र अर्जदाराने जाबदार यांचे नावाने असलेल्या शेतजमिनीचा उतारा छायांकीत प्रतीत अभिलेखावर दाखल केलेले आहे. जाबदार यांच्या मत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता त्यांनी सदरील जमिनीचा सदरील प्रतिज्ञापत्रात उल्लेख केलेला नाही. तसेच जाबदार याने दरमहा त्याचा खर्च रक्कम रू. ४०,०००/– असल्याचे कथन केलेले आहे. मात्र त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींच्या खर्चाबाबत काहीही कथन केलेले नाही. जाबदार हा त्याच्या मुलांचा दरवर्षी दोन लाख रुपये शैक्षणिक खर्च करत असल्याचे त्याने नमूद केले आहे. मात्र त्यांच्याकडे उत्पन्नाचा स्त्रोत नसल्याचादेखील त्याच्या म्हणण्यामध्ये व मत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद केलेले आहे. जर जाबदार याचे म्हणणे व मत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्र खरे धरले तर जाबदार क्र. १ हा असा खर्च कशाप्रकारे करत आहे याबाबत उपलब्ध पुराव्यावरून समजून येत नाही. त्याचप्रमाणे अर्जदाराने स्वतःचा मासिक खर्च वीस हजार रुपये असा नमूद केलेला आहे. मात्र अर्जदार ही सदरील खर्च कशाप्रकारे करत आहे याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. तसेच तिने तिच्याकडे कोणताही उत्पन्नाचा स्त्रोत नसल्याचे नमूद केले आहे. वरील सर्व परिस्थितीचे अवलोकन केले असता अर्जदार व जाबदार हे न्यायालयापासून त्यांचे उत्पन्न लपवून ठेवत आहेत अथवा शपथेवर खोटे सांगत

आहेत असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. अर्जदाराने देखील जाबदाराचे उत्पन्न दाखवण्याकामी कोणताही पुरावा अभिलेखावर आणलेले नाही.

२१.		वरील सर्व परिस्थितीचा एकंदरीत विचार केला असता व वाढत्या महागाईचा विचार केला असता अंतरिम पोटगीची रक्कम ही अर्जदाराच्या दैनंदिन गरजा पूर्ण करता येतील इतकी असावी असे या न्यायालयाचे मत आहे. जाबदार याचा एकूण दैनंदिन खर्च व त्याच्यावर असलेल्या जबाबदाऱ्या व आर्थिक दायित्व तसेच अर्जदाराच्या दैनंदिन गरजा व वैद्यकीय खर्च याचा एकत्रित विचार केला असता जाबदार यांनी अर्जदाराला दरमहा रक्कम रू. ५,०००/– इतकी पोटगी देणे न्यायोचित होईल. अशी पोटगी अर्जदाराला अर्ज दाखल तारखेपासून देण्यात यावी.

२२.		अर्जदाराने तिला घरभाडे म्हणून दरमहा रक्कम रू. ८,०००/– देण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. अर्जदाराने तिच्या पूर्ण अर्जामध्ये तिला तिच्या माहेरपासून स्वतंत्र राहायचे आहे याबाबत कोणतेही कथन केले नाही. सबब अर्जदाराला तिच्या मागणीप्रमाणे असा आदेश देता येणार नाही.

२३.		अर्जदाराने सदरील अर्जाचा खर्च व वकील फी तसेच अन्य खर्च असे एकूण मिळून २५,०००/– जाबदार यांचेकडून मिळावे, अशी प्रार्थना केलेली आहे. मात्र सदरील खर्च समर्थनीय आहे हे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा त्यांनी दिलेला नाही. शिवाय अर्जदार ही असा खर्च जर तिच्या अर्जातील अंतिम मागणीसाठी पात्र असेल, तरच तिला तो देता येऊ शकतो. सबब, सदरील खर्चाबाबत आताच आदेश पारित करणे योग्य ठरणार नाही. वरील सर्व कारणांचा मी एकत्रित विचार केला असता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते–

# आ दे श

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. जाबदार यांनी घरगुती हिंसाचाराचे कोणतेही कृत्य करण्यास, घरगुती हिंसाचाराच्या कृत्यांना मदत करण्यास किंवा प्रोत्साहन देण्यास किंवा अर्जदाराशी वैयक्तिक, तोंडी, लेखी, इलेक्ट्रॉनिक किंवा दूरध्वनी संपर्कासह कोणत्याही स्वरूपात संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यास मनाई करण्यात येते.

३. जाबदार क्रमांक १ याने प्रस्तुत अर्जाच्या दाखल तारखेपासून प्रकरण निकाली होईपर्यंत अर्जदाराला दरमहा रक्कम रू. ५,०००/– इतकी अंतरिम पोटगी द्यावे.

४. अर्जदाराची घरभाडेची मागणी नामंजूर करण्यात येते.

५. अर्जदाराची प्रस्तुतचा अर्ज चालवण्याकामी झालेला खर्च मागण्याची मागणी नामंजूर करण्यात येते.

६. अर्जदार आणि जाबदार हे ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहतात त्या संबंधित पोलीस ठाण्याला सदर आदेशाची प्रत पाठविण्यात यावी.

ROHINI SAMBHAJI PATIL
Digitally signed by ROHINI SAMBHAJI PATIL
Date: 2025.09.20 11:30:09 +0530

**सांगली.** **(रोहिणी सं. पाटील)**

**दिनांक – १९/०९/२०२५.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.१),**

**सांगली.**

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word for word as per original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | Shri. S. A. Jamadar |
| Court Name | : | Smt. R. S. Patil,<br>Judicial Magistrate First Class,<br>(Court no.1), Sangli. |
| Date of Order | : | 19/09/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 19/09/2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 20/09/2025 |